जोड पत्र क्र.
(नियम ५(२) पहा
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अन्वये

| मि. भा. म. न. पा. पाणी पुरवठा विभाग | |
|---|---|
| आ. क्र. | ४४ |
| दिनांक | 23/5/18 |
| कार्यकारी अभियंता | |

साधा अर्ज ☐
माहिती अधिकार अर्ज ☑

पा. क्र. 44639

प्रति,
**मा. कार्यकारी अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**अर्जदाराचे नाव :-** श्री. वसंत बळीराम माने (संपादक/संस्थापक - सर्वश्रेष्ठ राजसत्ता)

**अर्जदाराचा पत्ता :-** साईविल्ला - ४०९, छत्रपती शिवाजी मार्ग, मोदी पटेल क्रॉस रोड, भाईंदर पश्चिम
दूरध्वनी क्र.- ०९७६९७६४९८६ / ०९९३०४५०६२६

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- १)** नविन नळ कनेक्शनचे धोरण आणि सध्यथितीचे वितरण या नुसार जनता नगर, शिवसेना गली, भाईंदर (प) या ठिकाणी १ मार्च २०१८ ते ३१ मे २०१८ या दरम्यानं एकुण किती व कोणत्या सदनिका किंवा ठिकाणी नळ कनेक्शन्स देण्यात आली, ४ प्लस १ नुसार दिलेले कनेक्शन्स आणि व्यक्तिगत दिलेले कनेक्शन एकुण किती या बाबत संबंधितांनी जोडलेल्या दस्तावेजांची संचिका पृष्ट क्र. निहाय्य नोंदी करुन आपल्या कार्यालया मार्फत अवलोकन करुन, अचुक ठिकाणी टॅब लावून आम्हाला अवलोकनाअंती सत्य छायांकीत प्रतीसह माहिती देण्यात यावी. **२)** नळ कनेक्शन्स देण्या पुर्वी स्थलपाहणी तथा वस्तुस्थिती सवेक्षण अहवाल देणारे कर्मचारी यांना देण्यात आलेले आदेश आणि त्यानुसार त्यांनी सादर केलेले अहवालाच्या सत्य छायांकीत प्रती माहितीसाठी देण्यात यावी.
**टिप :** शासनाच्या माहिती अधिकारातील कायद्यानुसार वरीलपैकी जो विषय आपल्याशी निगडीत नाही तो ज्यांच्याशी निगडीत आहे त्यांच्याकडे सदर अर्ज वर्ग करुन तेथून माहिती मिळवून ती देण्यात यावी. माहिती देण्यास अधिक वेळ लागत असल्यास अर्ज वाचून ताबडतोब तसे कळविण्यात यावे.

**१) माहितीचा विषय :-** जनता नगर या ठिकाणी नव्याने देण्यात आलेली नळ कनेक्शन.

**२) माहितीशी संबंधीत कालावधी :-** १ मार्च २०१८ ते ३१ मे २०१८

**३) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :-** वरील प्रमाणे

**४) उद्देश :-** शहरात देण्यात येणारी नळ कनेक्शन्स आणि त्या कारभारातील पारदर्शक्ता या बाबत खात्री करणे.

**५) माहिती टपालाद्वारे की व्यक्तीशः आवश्यक आहे :-** टपालाद्वारे

**६) अर्जदार दारीद्र्य रेषेखालील आहे काय? :-** नाही.

**ठिकाण :-** भाईंदर
**दिनांक :-** 21/05/ २०१८

वसंत माने

श्री. मुषण
25-05-18

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांचे कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे – ४०१ १०१
जा.नं. मनमा/पापु/माअ/ ७८ /२०१८-१९
दि. १९/०६/२०१८

प्रति,
श्री. वसंत बळीराम माने,
साईविल्ला – ४०९,
मोदी पटेल क्रॉस रोड,
भाईंदर (प) ४०१ १०१..

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५.
दि.०१/०३/२०१८ ते ३१/०५/२०१८ पर्यंत देण्यात आलेल्या नविन नळजोडणीबाबत.

संदर्भ :- आपले दि. २१/०५/२०१८ रोजीचा माहिती अर्ज या विभागास दि.२३/०५/२०१८ रोजी प्राप्त.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये या विभागातील कार्यालयीन अभिलेख कक्ष तपासले असता या कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये उपलब्ध असलेली माहिती व साहाय्यक माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार आपणास देण्यात येत आहे.

मुद्दा क्र. ०१ - आपण अपेक्षिलेल्या मुद्यातील माहितीची अभिलेखाचे अवलोकन करणे करिता दि.२२/०६/२०१८ रोजी दु.३.०० वाजता उपस्थित रहावे. त्यानुसार आपण माहिती अधिकार अर्जात अपेक्षिलेल्या प्रमाणे अभिलेख नियमानुसार अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच सदर अभिलेखाचे अवलोकन करणेसाठी नियमानुसार लागणारे शुल्क अदा करणे बंधनकारक राहिल.

मुद्दा क्र. ०२ – नळ कनेक्शन देण्यापूर्वी मेस्त्री यांचेकडून स्थलपाहणी अहवाल घेण्यात येतो. सदरील स्थलपाहणी अहवालाच्या प्रती आपणास मुद्दा क्र. ०१ मधील देण्यात आलेल्या अवलोकनाच्या नस्तीमध्ये उपलब्ध होतील.

कळावे,

(शरद नानेगांवकर)
उप-अभियंता तथा माहिती अधिकारी (पापु)

E:\Nanegaokar\Mahiti Adhikar\2018-19\Vasant mane - 01-03-18 to 31-05-18 connection.doc

# मिरा-भाईदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांचे कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईदर (प.), ता.जि.ठाणे – ४०१ १०१
जा.नं. मनमा/पापु/माअ/ ८२ /२०१८-१९
दि. ०३/०७/२०१८

प्रति,
श्री. वसंत बळीराम माने,
साईविल्ला – ४०९,
मोदी पटेल क्रॉस रोड,
भाईदर (प) ४०१ १०१..

**विषय :-** केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५.
दि.०१/०३/२०१८ ते ३१/०५/२०१८ पर्यंत देण्यात आलेल्या नविन नळजोडणीबाबत.

**संदर्भ :-** १) आपले दि. २१/०५/२०१८ रोजीचा माहिती अर्ज या विभागास दि.२३/०५/२०१८ रोजी प्राप्त.
२) इकडिल जा.क्र. मनपा/पापु/माअ/७९/२०१८-१९ दि.१९/०६/२०१८ रोजीचे पत्र.
३) आपले दि.२२/०६/२०१८ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपण अपेक्षिलेल्या मुद्यातील माहितीची अभिलेखाचे अवलोकन करणे करिता दि.२२/०६/२०१८ रोजी दु.३.०० वाजता उपस्थित राहणेबाबत कळविले होते. परंतु संदर्भ क्र.०३ अन्वयेच्या पत्रानुसार अवलोकन करणेकरीता पुढील दिनांक व वेळ कळविणेबाबत कळविले आहे. त्यानुसार आपण दि.०५/०७/२०१८ रोजी दु.३.०० वा. अवलोकन करणेकरीता उपस्थित रहावे.

कळावे,

(शरद नानेगांवकर)
उप-अभियंता तथा माहिती अधिकारी (पापु)
मिरा-भाईदर महानगरपालिका

जयराम
9967064986

E:\Nanegaokar\Mahiti Adhikar\2018-19\Vasant mane - 01-03-18 to 31-05-18 connection.doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांचे कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईदर (प.), ता.जि.ठाणे – ४०१ १०१
जा.नं. मनमा/पापु/माअ/ ९९ /२०१८-१९
दि. ०६/०७/२०१८

प्रति,
श्री. वसंत बळीराम माने,
साईविल्ला – ४०९,
मोदी पटेल क्रॉस रोड,
भाईदर (प) ४०१ १०१..

**विषय :-** केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार २००५.
दि.०१/०३/२०१८ ते ३१/०५/२०१८ पर्यंत देण्यात आलेल्या नविन नळजोडणीबाबत.

**संदर्भ :-** १) आपले दि. २१/०५/२०१८ रोजीचा माहिती अर्ज या विभागास दि.२३/०५/२०१८ रोजी प्राप्त.
२) इकडिल जा.क्र. मनपा/पापु/माअ/७९/२०१८-१९ दि.१९/०६/२०१८ रोजीचे पत्र.
३) आपले दि.२२/०६/२०१८ रोजीचे पत्र.
४) इकडिल जा.क्र. मनपा/पापु/माअ/९२/२०१८-१९ दि.०३/०७/२०१८ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र. ०४ अन्वये कळविल्यानुसार दि.०५/०७/२०१८ रोजी केलेल्या अवलोकनानुसार आपण अपेक्षिलेल्या माहितीची पान क्र.०१ ते ८४ छायाप्रती आपणास सोबत जोडून देण्यात येत आहे.

कळावे,

(शरद नानेगांवकर)
उप-अभियंता तथा माहिती अधिकारी (पापु)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

10/07/2018.

E:\Nanegaokar\Mahiti Adhikar\2018-19\Vasant mane - 01-03-18 to 31-05-18 connection.doc